Office of the Collector HINGOLI

# जिल्हा निवड समिती, हिंगोली

## सरळसेवा भरती 2015 (तलाठी संवर्ग)

जाहिरात क्र.2015/अ-2/आस्था-1/कावी- दिनांक :- 25/06/2015

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन पत्र जा.क्र.भरती-2015/प्र.क्र.403/ई-7 दिनांक 04जुन, 2015 नुसार सामान्य प्रसान विभागाचे परिपत्रक दिनांक 26/05/2015 व वित्त विभागाचे शासन निर्णय दिनांक 02 जुन 2015 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार लिपीक व तलाठी संवर्गातील रिक्त पदे संपुर्ण राज्यात एकाच दिवशी घेण्या बाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागकडील शासन परिपत्रक दिनांक 26/05/2015 अन्वये गट अ ते ड मधील सरळसेवा कोट्यातील पदापैकी मंजूर पदाच्या प्रतीवर्षी कमाल 3 टक्के इतक्या कमाल मर्यादेत रिक्त पदे विहित कार्यपध्दतीत राबवून भरण्या बाबत शासनाचे दिनांक 03 जुन 2014 अन्वये दिलेले निर्देश रद्द करुन जिल्हा निवड समित्यांची त्यांच्या अखत्यारितील सर्व रिक्त पदे भरण्या बाबत उपाययोजना करुन तात्काळ अमलबजावणी करण्या बाबत निर्देश दिलेले असून शासन निर्णय वित्त विभागा कडील शासन निर्णय क्र. सकिर्ण/2015/परिपत्रक क्र.41/अर्थ-1 दि. 02/06/2015 मधील परिच्छेद 03 (क) अन्वये तलाठी या संवर्गातील एकुण रिक्त पदापैकी 75 टक्के पर्यंत पदे भरण्यास मुभा राहील असे निर्देश दिलेले आहे. त्याअन्वये हिंगोली जिल्हा आस्थापने अंतर्गत उपविभागांमध्ये रिक्त असलेली तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरणेसाठी खाली नमुद केलेल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडून जिल्हा निवड समितीमार्फत निवड करण्यासाठी या जाहिरातीव्दारे विहित नमुन्यात **Online** अर्ज मागविण्यात येत आहेत.

**प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

**तलाठी संवर्ग - (वेतनश्रेणी 6 व्या वेतन आयोगाप्रमाणे पे बँड 5200- 20200 ग्रेड पे-2400) (एकुण पदे 14)**

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकुण पदे | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग | खेळाडु | अंशकालीन उमेदवार | महिला | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |
| 1 | अ. जाती | 02 | - | - | - | - | - | 01 | - | 01 |
| 2 | वि.जा.अ | 01 | - | - | - | - | - | - | 01 | - |
| 3 | भ.ज. ड | 01 | - | - | - | - | - | - | 01 | - |
| 4 | इ.मा.व. | 04 | 01 | - | - | - | 01 | - | - | 02 |
| 5 | खुला | 06 | 01 | 01 | - | - | - | 01 | 02 | 01 |
| | एकूण | 14 | 02 | 01 | - | - | 01 | 02 | 04 | 04 |

**उपरोक्त संवर्गातील पदांची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे.**

Office of the Collector HINGOLI

1. **अटी व शर्ती :-**

1. **शैक्षणिक अर्हता :-**

| अ.क्र. | पदाचे नाव | आवश्यक अर्हता |
|---|---|---|
| 1 | तलाठी | 1) पदवी (शासन महसूल व वन विभाग अधिसुचना दिनांक 01 जुलै, 2010 अन्वये संविधानिक विद्यापीठाची पदवी तसेच शासनाने त्यांचेशी समतूल्य केलेली अन्य अर्हता.)<br>2) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रशिक्षण2000/प्रकरण-61/2001/39, दि.19/03/2003 नुसार संगणक अर्हता प्राप्त प्रमाणपत्र (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS - CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीचे दिनांकापासुन 2 (दोन) वर्षाचे आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा सेवा समाप्त होईल. |

**टीप :-** तलाठी संवर्गातील बिंदुनामावली नोंदवही मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद (मावक कक्ष) यांचेकडून पडताळणीच्या अधिन राहून प्रस्तुत जाहिरात देण्यात येत आहे. त्यामुळे पडताळणीमुळे आरक्षणात बदल झाल्यास त्याच प्रमाणे अनुषेश भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

2) **वयोमर्यादा :-**

- उमेदवाराचे वय दि. 01/06/2015 रोजी किमान 18 वर्षे व कमाल 33 वर्षा पेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी 5 वर्षाची शिथीलता)
- माजी सैनिकांसाठी त्यांनी सशस्त्र दलात केलेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्ष इतकी वयोमर्यादा राहील.
- अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील.
- खेळाडू उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथील
- पदविधर अंशकालीन उमेदवारासाठी सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.26.08.2005 अन्वये पदवीधर अंशकालीन म्हणून किमान 3 वर्षे काम केलेल्या व तीन वर्षाच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंद केलेल्या अंशकालीन पदवीधर उमेदवारांना कमाल वयोमर्यादा 46 वर्ष राहील.
- अ. स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य ब. सन 1991 चे जनगणना कर्मचारी व क. सन 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी या घटकातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्ष राहील. तसेच सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्ष इतकीच राहील.
- प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार कमाल वयोमर्यादा 45 वर्ष राहील.
- अपंग उमेदवारांकरीता वयाची कमाल मर्यादा 45 राहील, त्यामुळे इतर बाबी पासून मिळणारी वयाची शिथिलता लागू राहणार नाही.

3. **इतर अटी व शर्ती :-**

- अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा, तथापि महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्र.मकसी-1007/प्रक्र-36/का-36, दिनांक 10 जुलै 2008 पासून महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील दावा केलेल्या 865 गावातील 15 वर्षापासून रहिवाशी असणे आवश्यक आहे.
- उक्त पदासाठी आवश्यक अर्हता प्राप्त करणाऱ्या संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करू शकेल. मागासवर्गीय उमेदवारांनी (उपजिल्हाधिकारी दर्जाचे सक्षम अधिकारी) यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. आरक्षित पदावर निवड होणाऱ्या घटकातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून सहा महिनेसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल तसेच एक महिनेचे आत जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे उमेदवाराने स्वतः पाठवून पोंच पावती दाखल करणे आवश्यक राहील.

- अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / खुला प्रवर्ग वगळून अन्य सर्व मागासवर्गीय उमेदवारासाठी सन 2014-15 या वर्षाचे म्हणजे दिनांक 01/04/2015 नंतर निर्गमित केलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.
- शासन वित्त विभाग निर्णय क्र.अनियो/10/105/126/सेवा-4, दि.31.10.2005 नुसार दि.1 नोव्हेंबर 2005 रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवाराचा नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व म.ना.से.(निवृत्तीवेतनाचे अंशराशिकरण) नियम 1984) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.
- उमेदवारास शासन सामान्य प्रशासन परिपत्रक दि. 01/07/2005 नुसार म.ना.से.(लहान कुटुंबाचे ( प्रतिज्ञापन) नियम 2005 नुसार प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन देणे अनिवार्य आहे. परंतु सदर प्रक्रीया online पद्धतीची असल्यामुळे अर्ज भरताना उमेदवाराकडून हे प्रमाणपत्र स्वाक्षरीत करुन घेणे शक्य नाही. करीता online अर्ज भरताना त्यामधे अपत्य संख्या टाकावयाची आहे. यानंतर परीक्षेच्या वेळेस प्रवेशपत्रावर सदर प्रमाणपत्र समाविष्ठ करण्यात येईल. यावर सही करुन उमेदवाराने प्रवेशपत्र परीक्षा हॉलमधील समवेक्षकाकडे जमा करावयाचे आहे.
- सर्व पदासाठी आवश्यक अर्हतेनुसार शैक्षणिक प्रमाणपत्रे, संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र इत्यादीची माहिती अर्जात अचूकपणे अर्जात नमूद करावी.
- पदविधर अंशकालीन उमेदवाराने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केलेला क्रमांक अर्जात नमुद करणे आवश्यक राहील.
- शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्जात विभाग प्रमुखानी दिलेल्या परवानगीचा क्रमांक नमुद करणे आवश्यक राहील.
- जनगणणा कर्मचारी, स्वांतत्र्य सैनिकाचे पाल्य, उमेदवारांना समान गुण मिळणाऱ्या उमेदवारांमधून पसंती क्रमानुसार प्राधान्य देण्यात येईल.
- भुंकपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांना अर्ज करताना अर्जा सोबत प्राधिकृत अधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्राच्या मुळ सांक्षाकित प्रती अंतिम निवडच्या वेळी सादर करणे बंधनकारक होईल.
- 30 टक्के महिला आरक्षणासाठी महिला उमेदवार न मिळाल्यास त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमदेवारांमधून पदे भरण्यात येतील.
- पदाचे एकुण संवर्गानिहाय संख्येमध्ये व आरक्षणात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
- सदर जाहिराती मध्ये दर्शविलेल्या रिक्त पदाच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणने परिक्षा स्थगित झाल्यास त्या बाबत अर्जदाराला कोणता दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार पदांची संख्या समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण यात बदल करणे परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे अंशत: बदल करणे सेवा भरती प्रक्रियेत बदल करणे भरती प्रक्रीये संदर्भात उद्‌भवणारे वाद अन्य कोणतेही तांत्रीक प्रशासकीय अडचन तक्रारी या बाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती हिंगोली राखुन ठेवत आहे.उक्त कोणत्याही बाबीवर सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.
- या कार्यालया मार्फत अंतरजिल्हा /विभाग बदली बाबत समती देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे निवड होणाऱ्या उमेदवारास वर्षभरात होणारी पदोन्नती सेवा निवृत्ती इत्यादी अन्य कोणत्याही कारणामुळे जशी जशी पदे रिक्त होतील तशी तशी टप्या टप्याने रिक्त होणाऱ्या पदांवर नियमानुसार नियुक्ती देण्यात येईल.
- महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग पत्र दिनांक 26/08/2010 व अंशकालीन उमेदवारास शासन निर्णय दिनांक 27/10/2009 अन्वये देवू केलेले समांतर आरक्षण हे त्या शासकीय नोकरी मिळविण्यास सहाय्यभुत ठरावे या उद्देशाने दिले आहेत. उमेदवारांनी एकदा या समांतर आरक्षणाचा फायदा घेतला आहे. त्याच उमदेवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

**4. खेळाडू उमेदवारा करीता**

- महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, निर्णय क्र.रा.कि.यो.2002/प्र.क्र.68/क्री.यु.से.2 दि.30 एप्रिल 2005 मधील तरतुदीनुसार खेळाच्या स्पर्धा महाराष्ट्र ऑलंम्पीक असोशियेशनशी सलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात.अशा स्पर्धामध्ये वैयक्तीक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धामध्ये किंवा राज्य अजिंक्य स्पर्धेत प्रथम, व्दितीय किंवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा असावयास पाहिजे किंवा किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्यमिळालेल्या उमेदवारास प्राधान्य राहील करीता या बाबीचा अर्जात स्पष्ट पणे उल्लेख करावा. राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्र सेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदक प्राप्त केले असल्यास त्याचा तपशील द्यावा.

**5. महिला उमेदवारा करीता** :-

- खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमिलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले 30 टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. मागावर्गीय प्रवर्गातील इतर मागासप्रवर्ग, विजाअ, भजब, भजक, भजड या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे 30 टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागास प्रवर्गातील महिला खुल्या प्रवर्गातील जागाकरीता विकल्प देतील किंवा विकल्प न देताही मागास वर्गीयाच्या प्रवर्गातील महिला उमेदवाराची निवड खुल्या प्रवर्गातील आरक्षीत महिलाच्या जागेवर झाल्यास अशा महिलांनी त्यांच्याजातीची प्रमाणपत्रे सादर करावी लागतील . जर सदर महिला जातीची प्रमाणपत्रे सादर करु शकत नसतील तर अशा महिलांनी खुल्या प्रवर्गातील महिलाप्रमाणे उन्नत व्यक्ती गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
- मागासवर्ग प्रवर्गातील इतर मागासवर्ग विजाअ, भजब, भजक व भजड या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांनी महिलांच्या 30 टक्के आरक्षणासाठी क्रिमिलेअर मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी व मूळ प्रमाणपत्र अंतिम निवडीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
- 30 टक्के महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारातून भरण्यात येतील.

**6. माजी सैनिक उमेदवारांसाठी :-**

- शा.सा.प्र.विभाग परिपत्रक दि.10.10.1980 व दि.16.04.1981 नुसार माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरीता पात्र उमेदवार असावा.
- तसेच शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रंमाक-आरटीए-1090-22-प्रक्र-6-93-12- दिंनाक 8-6-1993 मधील तरतुदीनूसार माजी सैनिक उमेदवाराने माजी सैनिक या समांतर घटकाच्या आरक्षणाचा लाभ घेवून शासकीय सेवेत नौकरी स्विकारली असेल तर त्यास समांतर घटकाचा लाभास पात्र राहाणार नाही तो केवळ वयाची सवलत घेण्यास पात्र राहील.

**अर्ज स्विकारण्याचा दिनांक, प्रवेश पत्र वितरणाचा दिनांक, परीक्षेचा दिनांक खालील प्रमाणे आहे.**

| अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | परीक्षा शुल्क भरण्याचा शेवटचा दिनांक | | प्रवेश पत्र Online खालील दिनांकपासून उपलब्ध होतील | परीक्षेचा दिनांक | परीक्षेची वेळ |
|---|---|---|---|---|---|
| | पद्धत - 1 (बँक चालान) | पद्धत - 2 (Online Payment) | | | |
| 10.07.2015 (रात्री 11.00 पर्यत) | 13.07.2015 (बँक वेळेपर्यंत) व भरलेले बँक चालान टप्पा क्र. 2 मध्ये Upload करणे - दि. 13.07.2015 रात्री 11.00 पर्यत | 13.07.2015 (रात्री 11.00 पर्यत) | 14.07.2015 (सायं. 5.00 पासून) | 19.07.2015 | स. 11.00 ते 01.00 |

7. शुल्क (फी) :-

- प्रस्तुत भरतीप्रक्रियेसाठी सर्व संवर्गासाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील.
  - अर्जदारास परीक्षा शुल्क भरण्याचे दोन पर्याय उपलब्ध असतील.
    1. पध्दत-1 (Payment by Bank Challan)
    2. पध्दत-2 (E-payment /Online Payment)

    (अधिक माहितीसाठी खालील - "अर्ज कसा करावा" पहावे.)

| परीक्षा शुल्क | | अधिक रक्कम - Bank Commission / Processing Charges | |
|---|---|---|---|
| खुल्या प्रवर्गातील उमेदवार | मागास प्रवर्गातील उमेदवार | पद्धत - 1 बँकेच्या चलनाद्वारे रक्कम भरणे (Bank Commission) | पद्धत - 2 e-Payment (Online Payment) (Online Transaction Charges) |
| 300/- | 150/- | 10/- | 20/- |

- **माजी सैनिक व अपंग यांना परीक्षा शुल्क लागू नाही.**
- वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

8. निवड पध्दती :- तलाठी

- महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक 01/01/2010 नुसार तलाठी या पदासाठी निवड करताना मुलाखत न घेता, फक्त लेखी परीक्षा घेण्यात येईल व लेखी परीक्षेमध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्याआधारावर गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
- शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक 19/10/2007 अन्वये लेखी परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्न पत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता 12 वी च्या) दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी 50 गुण ठेवून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदरील लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

- **निवडीसाठी सर्वसाधारण सुचना**
- **उमेदवारास समान गुण मिळाल्यास :-** परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं.प्रानिम-2007-प्रक्र-46-07-13-अ दिंनाक 27/06/2008 तसेच याबाबतीत शासनाकडील इतर निकषानुसार लावला जाईल.
- लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
- वरील पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेवारांनी एकूण गुणांच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
- निवड प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर 60 दिवसाचे कालावधीनंतर प्रश्न पत्रिका व उत्तर पत्रिका नष्ट केल्या जातील.

9. **Online अर्ज करणे प्रक्रीयेची थोडक्यात पद्धती. (विस्तृत माहितीसाठी संकेतस्थळावरील "अर्ज कसा भरावा - विस्तृत माहिती" पहावे.)**

- टप्पा क्र. 1
  - a) प्रत्यक्ष अर्ज भरण्यापूर्वी या पदाबाबतीची विस्तृत जाहिरातीचे वाचन करुन त्यातील अटी व शर्ती पडताळून पहाव्यात.सदर विस्तृत जाहिरात http://hingoli.applygov.com व www.hingoli.nic.in वर उपलब्ध आहे.
  - b) http://hingoli.applygov.com या संकेतस्थळावर ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या Link वर किंवा Apply now या Link वर Click करावे व पुढील माहिती भरावी.
  - c) अर्ज करण्यापुर्वी उमेदवाराने खालीलप्रमाणे नजीकच्या काळातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरीची स्कॅन इमेज Soft copy स्वरुपात तयार करुन स्वत:कडे ठेवावीत.

| तपशील | Size Limit | Details | केंव्हा लागेल |
|---|---|---|---|
| अर्जदाराचे अलिकडील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (Recent Photo graph) | JPEG FORMAT मधील 15-75 KB | • लांबी/रुंदी प्रमाण (Proportion) 3:4 असावे.<br>• छायाचित्र समोर चेहरा असलेले असावे.<br>• छायाचित्राचा 75% भाग चेहरा असावा.<br>• छायाचित्र नजीकचे व स्पष्ट असावे. | टप्पा क्र. 1 |
| अर्जदाराची स्वाक्षरी | JPEG FORMAT मधील 10-50 KB | • कोऱ्या कागदावर गडद/जाड पॉईटच्या पेनने केलेली असावी.<br>• स्वाक्षरी स्पष्ट असावी व लांबी/रुंदी प्रमाण 2:1 असावे.<br>• रुलींग पेपर अथवा स्वाक्षरी व्यतिरीक्त इतर बाबी असलेल्या कागदाचा उपयोग करु नये. | |
| Challan ची Scanned Soft Copy | JPEG FORMAT मधील 50-500 KB | टप्पा क्र. 2 साठी बँकेत भरलेल्या बँकेच्या शिक्क्यासोबत Challan ची Scanned Soft Copy (फक्त टप्पा क्र. 2 मध्येच)<br>**(Online पद्धतीने परीक्षा शुल्क भरल्यास टप्पा-2 लागू नाही )** | टप्पा क्र. 2 |

  - d) उमेदवाराची Photo व सही व्यतिरिक्त कोणत्याही प्रमाणपत्र / अभिलेख्यांची Soft Copy अर्ज भरताना सोबत जोडावयाची (upload करण्याची) आवश्यकता नाही.
  - e) त्यानंतर Open होणाऱ्या पेजवरील पदाचे नाव निवडावे व अर्जातील इतर आवश्यक सर्व माहिती भरावी.
  - f) अर्जदाराने Upload केलेली Image सुस्पष्ट नसल्यास तो अपात्र ठरविला जाऊ शकतो.
  - g) सदर पेजवरील सर्व माहिती भरल्यानंतर व छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर continue यावर click करावे.
  - h) अर्जात भरलेली माहिती परिपूर्ण असल्यास येणाऱ्या मेसेज बॉक्समध्ये भरती प्रक्रीयतील पुढील बाबींसाठी (उदा. अर्जाची पात्रता पाहणे, प्रवेशपत्र काढणे इ. ) जन्मतारीख आवश्यक असल्याने ती बरोबर असल्याची खात्री करा अथवा "Edit Form" यावर click करुन फॉर्ममध्ये बदल करा" असा संदेश दिसेल.
  - i) अर्जातील माहिती बरोबर असल्याची खात्री असल्यास अथवा चुकीची माहिती बरोबर केल्यानंतर "Save & Continue" यावर click करावे. त्यानंतर अर्जाचा ID, ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची अथवा विहित केलेल्या बँकेत परीक्षा शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख याबाबतची माहिती उमेदवारास दिसेल. तसेच अर्जात नमुद भ्रमणध्वनी क्रमांकावर व ई-मेल वर सदर माहिती पाठविण्यात येईल.

j) तयार झालेला Form ID भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेत उपयुक्त असल्याने, तो उमेदवारांनी सांभाळून/ नोंद करुन ठेवावा. यानंतर अर्जात भरलेली माहिती उमेदवारास बदलता येणार नाही.

<u>------ टप्पा क्र. 1 पूर्ण ------</u>

k) **<u>त्यानंतर अर्जदारास परीक्षा शुल्क भरण्याचे दोन पर्याय उपलब्ध असतील.</u>**

i) <u>पध्दत-1 (Payment by Bank Challan) (टप्पा क्र. 2 अनिवार्य)</u>

ii) <u>पध्दत-2 (E-Payment / Online Payment) (टप्पा क्र. 2 ची गरज नाही)</u>

l) <u>पध्दत-1 (Payment by Bank Challan)</u> - टप्पा क्र. 1 पूर्ण केल्यानंतर अर्जदाराने "Print Challan" यावर Click करुन चलानची प्रिंट घ्यावी. चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फत उमेदवाराने चलनात नमुद असलेले आवश्यकतेनुसार परीक्षा शुल्क **स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या** कोणत्याही शाखेमध्ये, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत भरता येईल. चलनाच्या 3 प्रतींपैकी, दोन प्रती बँकेकडून अर्जदारास परत दिल्या जातील. यावर बँकेचा शिक्का व तयार झालेला Journal No. असेल. कृपया याची खात्री करुन घ्यावी जर शिक्का किंवा Journal No. नसल्यास बँक कॅशीयरच्या निदर्शनास आणून द्यावे.

- <u>टप्पा क्र. 2</u>

m) **<u>पध्दत-1 नुसार परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेल्या अर्जदारांसाठी टप्पा क्र. 2 अनिवार्य आहे</u>**

n) टप्पा क्र. 2 वरील माहिती भरण्यापूर्वी मिळालेल्या चलनापैकी Journal No. व बँकेचा शिक्का सुस्पष्ट असलेल्या चलनाची स्कॅन इमेज तयार करुन ठेवावी.

o) दिलेल्या संकेतस्थळावर येऊन **"चलनाची माहिती भरा (टप्पा-2)"** यावर click करावे.

p) उमेदवाराने त्याचा "Form ID" व "Date of Birth" याबाबतची माहिती भरुन "Open Form" यावर click करावे. उमेदवारास त्याची माहिती दिसेल. Journal No. च्या रकान्यात बँकेने दिलेल्या चलनामध्ये नमूद केलेला Journal No. भरावा. त्याखालीच बँकेने दिलेल्या Challan ची Scanned Soft Copy Upload करावी. याशिवाय Form भरण्याची प्रक्रि या पुर्ण होणार नाही.

q) यानंतर उमेदवाराने "अर्जात नमूद केलेली सर्व माहिती व तपशील अचूक असून कोणतीही माहिती अथवा तपशील चुकीचा अथवा खोटा आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल याची जाणीव आहे." असे प्रतिज्ञापत्र मान्य करुन "Submit my form" वर click करावे. त्यानंतर अर्ज सादर होईल. अर्जात नमूद भ्रमणध्वनी क्रमांकावर परीक्षा शुल्काबाबतचे चलनाची माहिती भरल्याचा संदेश जाईल.

r) Online अर्ज केल्यानंतर संकेतस्थळावर निघणारेच Challan बँकेत रक्कम भरण्यासाठी वापरावे.

s) उमेदवाराची निवड झाल्यास सदर Challan उमेदवाराने सादर करावयाचे असल्यामुळे उमेदवारांनी सदर Challan ची प्रत सांभाळून ठेवावी.

<u>------ टप्पा क्र. 2 पूर्ण ------</u>

t) <u>**पध्दत-2 (E-Payment / Online Payment)**</u> - अर्जदाराने "Pay online" यावर click करावे. त्यानंतरच्या पेजवर "Go to payment page" यावर click करावे. त्यानंतर परीक्षा शुल्क भरण्यासाठीची आवश्यक माहिती जसे Net Banking Details / डेबीट/क्रेडीट कार्ड क्रमांक, नांव, वैधता दिनांक, कार्डचा प्रकार, बँकेचे नांव, खाते क्रमांक, पासवर्ड इत्यादी ई-पेमेंट प्रकाराच्या आवश्यकतेनुसार भरावे व ई-पेमेंट करावे. त्यानंतर तयार होणाऱ्या पावतीची प्रिंट स्वत:कडे ठेवावी. (Online Payment कसे भरावे याकरीता Home Page वरील शंका समाधान यावर Click करावे.)

u) अर्ज भरतेवेळी e-payment पध्दतीने परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांना e-payment च्या पावतीची प्रत, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी कार्यालयाकडे जमा करावी लागेल. सदर चलनाची मुळ प्रत/e-payment ची पावती असल्याशिवाय

उमेदवाराची कागदपत्रे छाननी केली जाणार नाहीत व त्यास अपात्र ठरविण्यात येईल. परीक्षा शुल्क भरण्याच्या अंतिम दिनांकानंतर याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

<u>**पद्धत 1 व पद्धत 2 प्रमाणे अर्ज करणाऱ्या उमेदवारांना सामाईक सूचना**</u>

v) ऑनलाईन पध्दतीने प्राप्त अर्ज व भरलेले परीक्षा शुल्क यांची छाननी करुन अर्जांची पात्र-अपात्रता ठरविण्यात येईल. अर्जांची पात्र-अपात्रता चलनाची माहिती भरल्यानंतर अथवा ई-पेमेंट केल्यानंतर 48 तासाने पाहता येईल. उमेदवाराने पद्धत 1 / 2 नूसार सदर रक्कम भरल्यानंतर 48 तासात उमेदवारास ही प्रक्रीया यशस्वीरित्या पुर्ण झाल्याचा e-mail व SMS द्वारे संदेश देण्यात येईल. पद्धत 1 / 2 नूसार रक्कम भरल्यानंतर 48 तासांच्या पूर्वीच अर्जदाराने त्याची पात्रता संकेतस्थळावर तपासल्यास आपल्या परीक्षा शुल्काची वैधता तपासणी प्रलंबीत आहे. कृपया 24 तासानंतर तपासा. अशी सूचना दिसेल.

w) तपासणी अंती चुकीची माहीती आढळल्यास, अर्जात नमूद भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करुन चालानची माहीती परत भरण्यासाठी लिंक खूली केल्याचे कळविण्यात येईल. काही कारणास्तव उमेदवारास संपर्क होवू शकला नाही तर उमेदवारांनी त्यांच्या अर्जाची पात्रता तपासावी. जर चालानची माहीती भरल्याच्या 24 ते 48 तासानंतर अर्ज अपात्र असल्यास मदतीसाठी दिलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

x) त्यासाठी http://hingoli.applygov.com संकेतस्थळावर " अर्जाची पात्रता" या सदरावर clik करावे. त्यानंतरच्या पेजवर पदाच्या नावाची निवड करुन From ID व जन्मदिनांक याबाबतची माहिती भरावी. ती माहिती भल्यानंतर "Open From" यावर clik केल्या नंतर केलेल्या अर्जाची पात्र अपात्रता पाहता येईल.

y) पात्र ठरलेल्या अर्जदराने भरलेल्या अर्जाची पोच पावती यावर clik करावे त्यांनंतरच्या पेजवर पदाची निवड करुन Form ID व Date of Birth हि माहिती भरुन Print Recipit या वर clik करावे यानंतर उमेदरावांच्या अर्जाची पोच पावती उपलब्ध होईल.

z) असा E-mail किंवा SMS प्राप्त झाल्यानंतर उमेदवार Form ची पोच पावती प्रिंट काढून घेवू शकतो सदरील Form पोच पावती print काढण्यासाठी बाब **इच्छीक** असून उमेदवाराला रक्कम भरणेची प्रक्रिया यशस्वी रित्या पुर्ण झाल्याचा प्राप्त E-mail किंवा SMS पोच पावती म्हणून ग्राह्य धरली जावू शकते.

aa) अपात्र ठरलेल्या अर्जाच्या बाबतीत आक्षेप असल्यास मदतीचा भ्रमणध्वणी क्रमांकावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 सांयकाळी 6.00 पर्यंत संपर्क साधावा अथवा support@applygvo.com या ईमेल संपर्कावर आपले म्हणने कळवावे.

bb) उमेदवारांनी अर्ज करताना त्यांचा अचूक भ्रमणध्वणी क्रमांक व ई-मेल आयडी हे रकाने भरणे अनिवार्य असेल तरी त्यांनी अशी माहिती दिल्यास त्यांना SMS व E-mail द्वारे त्यांच्या अर्जा संबंधीची वेळोवेळी विविध माहिती कळविणे शक्य होईल. परंतु उमदेवारांनी Online अर्जात नोदंवलेली E-mail ID व मोबाईल क्रमांक चुकीचा तसेच मोबाईल क्रमांक NCPR Regestor (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रीये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना व संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबादारी संबंधीत उमेदरावाची राहिल तसेच E-mail ID व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रीक अडचणीना कार्यालय जबाबादार असणार नाही. सदर संकेतस्थाळाला भरती प्रक्रीये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयेच्या माहिती बाबत अद्यावत राहण्याची संपूर्ण जबाबादारी उमेदरावाची राहिल. अपात्र ठरत असलेल्या उमेदवारांना E-mail व SMS द्वारे कळविण्यात येईल.

**10. परिक्षेच्या संबंधीत इतर महत्याची माहिती :-**

- Online Form भरण्याची शेवटची वेळ दिनांक 10/07/2015 (रोज शुक्रवार) रोजी रात्री 11.00 वाजेपर्यंत राहील.
- टप्पा क्र. 02 मध्ये चालानाची Soft copy संकेतस्थळावर upload करण्याची शेवटची वेळ दि. 12/07/2015 (रोज बुधवार) रात्री 11.00 वाजेपर्यंत राहील.
- वरील दिलेल्या विहीत वेळेनंतर संकेतस्थळावरून अर्ज भरण्याची प्रक्रीया काढून टाकण्यात येईल.

- अर्ज फक्त Online पध्दतीनेच स्विकारल्या जातील. कार्यलायात प्रत्यक्ष स्वरुपात कोणतेही अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.
- उमेदवारांनी अर्ज करताना त्यांचा भ्रमध्वणी क्रमांक (Mobile No.) व Email ID हे रकाने भरणे अनिवार्य नसले तरी त्यांना अशी माहिती दिल्यास, त्यांना SMS व Email द्वारे त्यांच्या अर्जासंबंधीची वेळोवेळी विविध माहिती कळविणे शक्य होईल.
- जे उमेदवार Online अर्ज भरुन Challan ची Print घेतील परंतु बँकेत ती रक्कम भरणार नाहीत अशा उमेदवारांना शेवटच्या दिनांका अगोदर SMS द्वारे कळविले जाईल. शेवटच्या दिनांकानंतर शुल्क भरलेले किंवा परीक्षा शुल्क न भरलेले उमेदवार अपात्र ठरतील.
- टप्पा क्र. 02 मध्ये अर्जदाराने बँकेत भरलेले चालानची Soft copy- Upload केल्यानंतर या कार्यालयातर्फे Upload केलेले Challan ची पडताळणी केली जाईल. जर Upload केलेली Image अस्पष्ट /चूक /इतर असल्यास या कार्यालयातर्फे अर्जदारांना फोन केला जाईल व त्यांना ते परत Upload करण्यासंदर्भात सूचना देण्यात येतील.
- टप्पा क्र. 02 पूर्ण केल्यानंतर 48 तासानंतर अर्जदारांना त्यांची पोचपावती काढता येईल. तसेच संकेतस्थळाच्या मुख्यपृष्ठीवरील (Home page) **<u>अर्जाची पात्रता</u>** <u>या link</u> वर Clik केल्यानंतर 'आपण लेखी परीक्षेसाठी पात्र ठरला आहात' असे दिसून येईल. परंतु ज्या अर्जदारांनी अद्यापपावेतो बँकेत पैसे भरले नाहीत किंवा टप्पा क्र. 2 पूर्ण करुन 48 तास झाले नाहीत अशा अर्जदारांना 'आपण टप्पा क्र. 02 पूर्ण केला नाही किंवा केला असल्यास अद्याप आपल्या चालानची पडताळणी न झाल्यामुळे अद्याप आपण लेखी परीक्षेस पात्र ठरला नाहीत' अशी माहिती दिसेल.
- परंतू, बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा शेवटच्या दिवसानंतर शुल्क भरलेले किंवा परीक्षा शुल्क न भरलेले उमेदवार यांना मात्र **'आपण लेखी परीक्षेसाठी अपात्र ठरला आहात'** अशी माहिती दिसेल. दि. 13/07/2015 पासून तसेच, अशा अर्जदारांना अपात्र असल्याचे दिसून येईल.
- अर्जदारांनी प्रवेशपत्र दि. 14/07/2015 रोजीपासून Download करुन घ्यावयाचे आहेत. **या कार्यालयाकडून प्रवेशपत्र निर्गमित केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.** उमेदवारांना सदर प्रवेशपत्र हस्तगत करण्यात काही अडचणी असल्यास, प्रवेशपत्राची दुय्यम प्रत दिनांक 18/07/2015 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत या कार्यालयातून निर्गमित केली जाईल.
- सदरील परीक्षा खाली नमुद केल्याप्रमाणे **<u>हिंगोली मुख्यालयी</u>** घेण्यात येईल.
- <u>उमेदवाराने भरलेल्या माहिती आधारे</u> त्यास <u>प्रवेशपत्र देऊन परीक्षेस पात्र करण्यात येईल. तेंव्हा अर्जदाराने Online अर्ज भरताना वस्तुनिष्ठ व अचूक माहिती भरावी तसेच Online अर्जासोबत कोणेतही प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे जोडू (upload) करु नयेत. उमेदवाराची निवड अंतीम गुणवत्ता यादीत झाल्यास online अर्जाप्रमाणे त्याची सर्व मुळ प्रमाणपत्रे / अभिलेखे यांची सत्यता पडताळणी करण्यात येईल. सत्यता पडताळणीच्या वेळेस उमेदवाराने online भरलेल्या अर्जात नमूद केलेल्या माहितीव्यतिरिक्त सादर केलेल्या इतर कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.</u> **तसेच पडताळणी करताना उमेदवाराने online भरलेल्या अर्जात नमूद केलेल्या बाबीचे प्रमाणपत्र / अभिलेख तो सादर करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला भरती प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल. <u>त्याच बरोबर पुढील गुणानूक्रमे असलेल्या उमेदवारास संधी देण्यात येईल.</u>**
- प्रस्तुत प्रक्रीया ही Online पध्दतीने असल्याने उमेदवाराने माहिती भरताना अचुक / खरी / जी कागदपत्रे/प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत, अशीच माहिती भरावी. चुकीची / खोटी / दिशाभूल करणारी / अन्य इसमाची अथवा नंतर उशीराने कागदपत्रे / प्रमाणपत्रे उपलब्ध होणारी माहिती भरल्यास व भविष्यात निदर्शनास आल्यास अथवा अशा उमेदवाराची निवड झाल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल व शासनाची फसवणुक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येईल, यांची संबंधीतांना गांभिर्यपुर्वक नोंद घ्यावी.
- सर्व प्रक्रीयेमध्ये काही अडचणी असल्यास मदतीसाठी भ्रमणध्वनी क्र. 0777 686 9995, 0777 686 5550 यावर सकाळी 10 ते सायं. 6.00 या वेळेत संपर्क साधावा.
- यापुढील सर्व माहिती जसे, पात्र / अपात्र उमेदवारांच्या याद्या विद्यार्थ्यांचे Online प्रवेशपत्र, उमेदवारांची प्राप्त गुण यादी, अंतिम निवड यादी इ. http://hingoli.applygov.com या संकेतस्थळावरील **'तलाठी भरती प्रक्रीया 2015'** या शिर्षकाखाली उपलब्ध राहील.

- काही प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण उद्भवल्यास निवड स्थगित अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समितीस राहतील.
- उमेदवाराने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.
- अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे असणार नाही.
- आस्थापनेवरील पद भरतीच्या अनुषंगाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनाप्रमाणे आरक्षणाबाबत व इतर सूचनाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्या अटी जशास तशा लागू राहतील.
- सदर प्रक्रीयेबाबत काही तक्रार असल्यास या कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक 02456 222560 या क्रमांकावर संपर्क साधावा.

**दिनांक :- 25/06/2014**
**स्थळ : हिंगोली**

**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती,**
**तथा निवासी उपजिल्हाधिकारी**
**हिंगोली**

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी**
**तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
**हिंगोली**